सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
राष्ट्रीय छात्र सेना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
लेफ्ट. आशिष सांगळे
संपर्क : +९१७०२८९९११८१
: ०२०-२५६२२६८६

संदर्भ क्र. विविमं/२०२३–२४/१५८ दिनांक : १७/०२/२०२४

प्रति,

मा. प्राचार्य/मा. संचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

विषय : राष्ट्रीय छात्र सेना (एन. सी. सी.) कार्यरत तुकडीच्या महितीबाबत.

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास दिनांक २९ सप्टेंबर, २०२२ पासून राष्ट्रीय छात्र सेना तुकडीची मान्यता मिळाली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राष्ट्रीय छात्र सेना सदैव विद्यार्थ्यांवर एकता व स्वयंशिस्त तसेच श्रम–संस्कार, कौशल्य–संस्कार, सर्वांगीण चारित्र्य विकास देखिल व्हावेत यासाठी गतीमान आहे. या अनुषंगाने विविध उपक्रमात कॅडेटचा उस्फूर्त प्रतिसाद व सहभाग लाभत असतो. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील राष्ट्रीय छात्र सेना तुकडीच्यावतीने शैक्षणिक वर्ष २०२२–२३ मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या ज्या महाविद्यायांमध्ये/संस्थेमध्ये राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.) तुकडी कार्यरत आहे, त्या महाविद्यालयातील/संस्थेतील टी.एस.सी, व्ही.एस.सी, एन.एस.सी, आय.डी.एस.सी. (शुटींग), आर.डी.सी. (आर्मी, नेव्ही व एअरविंग) पदवी/पदव्युत्तर शाखेतील ज्या विद्यार्थ्यांची विशेष कामगिरी केलेली आहे, त्यासंबंधी २५ मार्च, २०२३ रोजी पुणे जिल्हयांतील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या ज्या महाविद्यायांमध्ये/संस्थेमध्ये राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.) तुकडीतील कॅडेटचा व सहयोगी एनसीसी अधिकारी (ए.एन.ओ.) यांचा सत्कार करण्यात आला होता.

शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मध्ये पुणे, अहमदनगर आणि नाशिक जिल्हयातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या ज्या महाविद्यायांमध्ये/संस्थेमध्ये राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.) तुकडीतील कॅडेटचा व सहयोगी एनसीसी अधिकारी (ए.एन.ओ.) यांचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील राष्ट्रीय छात्र सेना तुकडीच्यावतीने गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात येणार आहे. ही बाब आपल्या महाविद्यालयात/मान्यताप्राप्त परिसंस्थेतील राष्ट्रीय छात्र सेनेचे छात्र व सहयोगी एनसीसी अधिकारी (ए.एन.ओ.)/(सी.टी.ओ) यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

वरीलप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या ज्या महाविद्यायांमध्ये/संस्थेमध्ये राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.) तुकडी कार्यरत आहे, त्या महाविद्यालयातील/संस्थेतील टी.एस.सी, व्ही.एस.सी, एन.एस.सी, आय.डी.एस.सी. (शुटींग), आर.डी.सी. (आर्मी, नेव्ही व एअरविंग) पदवी/पदव्युत्तर शाखेतील ज्या कॅडेट/ए.एन.ओ. विशेष कामगिरी केलेली आहे. त्यांची माहिती **(www.unipune.ac.in – BOD online – login – NCC) येथे शनिवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२४ पर्यंत भरण्यात यावी.** ऑनलाईन (Online) पद्धतीने भरलेल्या माहितीची प्रिंट काढून त्यावर सहयोगी एनसीसी अधिकारी (ए.एन.ओ.)/(सी.टी.ओ) आणि प्राचार्य/संचालक यांची स्वाक्षरी असलेली माहिती स्कॅन करून तिथेच अपलोड करावी. सदर माहिती ऑनलाईन (Online) पद्धतीने भरणे अनिवार्य आहे. याची नोंद घ्यावी. कळावे, ही विनंती.

अधिक माहिती साठी संपर्क :
श्री. सुरज शिंदे, (एन.सी.सी. कार्यालय)
संपर्क क्र. ०९६८९७६९९७३

(ले. आशिष सांगळे)
सहयोगी एनसीसी अधिकारी,
राष्ट्रीय छात्र सेना

(डॉ. अभिजीत कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ